आंजी लघु प्रकल्प तालुका राळेगांव,
जि.यवतमाळ मातिकाम व बांधकामाचा
विशेष दुरुस्ती व पुन:स्थापनेच्या कामाचा
प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक : प्रमा-२०१८/ (प्र.क्र. ४४४/२०१८)/ सिं.व्य.(कामे)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: ०७/०३/२०१९

वाचा:- १. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र जा.क्र. ११०९३/विपाविम/कातां-३(१)/२०१८, दि.१३/११/२०१८.

२. शासन निर्णय - २०१७/५६६/१७/सिंव्य(कामे), दि.३१/०८/२०१८.

३. शासन निर्णय - संकीर्ण-२०१६/(२७/२०१६)/लपा-२, दि.२६/०५/२०१७.

प्रस्तावना:-

आंजी ल. पा. प्रकल्प, ता. राळेगाव, जि. यवतमाळ हा लघु प्रकल्प यवतमाळ जिल्हयातील राळेगाव तालुक्यातील आंजी गावालगत स्थानिक नाल्यावर सन १९८५ मध्ये बांधण्यात आला आहे. या प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्र १०.१० चौ.कि.मी. असुन क्षेत्रात सरासरी ८५० मी.मी. पाऊस पडतो.प्रकल्पाचे माती धरणाची लांबी ३८५ मी. असुन माती धरणाची महत्तम उंची २०.३८ मी. आहे. प्रकल्पास ओगी पध्दतीचा व्दारविरहीत युक्त ७४.०० मी. लांबीचा सांडवा असुन व सांडव्याचा संकल्पीत महत्तम पुरविसर्ग २९१.५० घ.मी./से. आहे. सदर प्रकल्पास ६.०० कि.मी. लांबीचा मुख्य कालवा व २.५० किमी लांबीची वितरीका असुन त्याची वहनक्षमता ०.३८ घ.मी./से. आहे. प्रकल्पाचा एकुण पाणीसाठा २.८० दलघमी असुन, उपयुक्त पाणीसाठा २.६९ दलघमी आहे. प्रकल्पाचे एकुण समादेश क्षेत्र ८५८ हेक्टर , वहतीलायक क्षेत्र ७७५ हे. व एकुण सिंचन क्षमता ५६९ हे. आहे. सदर प्रकल्पामुळे राळेगाव तहसील मधील आंजी, सावनेर, चिंचोली व वाढोणा बाजार या ४ गावातील शेतकरी सिंचनाचा फ़ायदा घेतात. सदर प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण होऊन जवळजवळ ३० वर्षे पुर्ण झालेल्यामुळे धरणावरील माथा पातळी काही साखळीमध्ये दबलेली आहे. तसेच धरणावरील मुख्य विमोचकाचे आतील व बाहेरील भागातील गिलावा क्षतीग्रस्त झाल्याने त्यामधुन पाझर होत आहे. धरणावरील सांडवा सुध्दा काही प्रमाणात क्षतीग्रस्त झालेला असुन त्याबाबतची सुरक्षिततेच्या अनुषंगाने किरकोळ दुरुस्ती प्रस्ताव अंतर्गीत करण्यात आलेली आहे. धरणावरील दोन्ही बाजुच्या उतारावर मोठ्या परिमाणात झाडे वाढलेली असुन धरण सुरक्षिततेच्या अनुषंगाने साफ़सफ़ाई करणे आवश्यक असल्यामुळे त्याबाबतची तरतुद सुध्दा सदर प्रस्तावा मध्ये करण्यात आलेली आहे. तसेच धरणाच्या वरच्या बाजुस असलेले अश्मपटल काही भागात विस्कळीत झालेले असुन Pitching Rearrangement ची तरतुद या प्रस्तावात करण्यात आलेली आहे..सदर कामाची मागणी पाणी वापरसंस्थेने व लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी केलेली होती. या अनुषंगाने संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये विभागास देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर कामाकरीता विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

आंजी लघु प्रकल्प तालुका राळेगांव,जि. यवतमाळ वरील मातिकाम व बांधकामाचा विशेष दुरूस्ती कामास विस्तार व सुधारणा अंतर्गत रु. **८१,२३,४६५** , ३% अनुषंगिक व १ टक्का वर्कचार्ज एस्टॅब्लीशमेंट, स्वमीत्व शुल्क व G.S.T.खर्च रु. ३३,९०,३९१, अशा एकूण रु. **१,१५,१३,८५६** (रू.एक कोटी पंधरा लक्ष, तेरा हजार, आठशे छप्पन फक्त) एवढया खर्चाच्या प्रस्तावास संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये विभागास दिलेल्या आधिकारान्वये व आं.वि.स. व उ.स. यांच्या सहमतीने खालील अटींच्या अधिन राहून सोबतच्या प्रपत्रानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. शासन परिपत्रक क्र.प्रमा-२०१३/(७८५/१३)/सिं.व्य.(कामे), ०१.०१.२०१५ मधील मागदर्शक सूचनांचे पालन करणे अभिलेखे ठेवणे व कार्यवाही करणे महामंडळावर बंधनकारक आहे.

२. शासन पत्र दि.०४/०६/२०१६ अन्वये तपासणी सूचीतील मुद्दे आर्थिक निकष मा. राज्यपाल यांच्या निर्देशानुसार १० % मर्यादेत निधी खर्च करणे, दायित्व निर्मिती मर्यादेत राहण्यासाठी कामाचे दोन वर्षाचे नियोजन करणे याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाची राहील.

३. तांत्रिक मान्यतेपूर्वी बांधकामाचे सविस्तर सर्वेक्षण व संकल्पनावर आधारित तरतूद करण्याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाची राहील.

४. अंदाजपत्रकात गृहीत धरलेले आराखडे / संकल्पने दरसूची बाह्यबाबी व वहन अंतरे तपासून अंदाजपत्रकास सक्षमस्तरावर तांत्रिक मान्यता प्रदान करावी. कोणत्याही परिस्थितीत भविष्यात परिमाण वाढ वा खर्चात वाढ होणार नाही,याची खात्री करावी.

५. पाणी वापर सदस्यांना विश्वासात घेऊनच आवश्यक तरतूद करणे. प्रकल्पावरील पाणी वापर संस्थेकडे संपूर्ण लाभक्षेत्र हस्तांतरणाचे नियोजन काम सुरु करण्यापूर्वी करावे, कामे पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरण करावे याची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील.

६. माती कामे व गवत झाडे / झुडपे काढण्याची कामे जलसंपदा विभागाच्या यांत्रिकी संघटनेकडे उपलब्ध मशिनरीने करावीत.

७. प्रस्तावीत कामांमुळे खोदकाम/ तोडफोड उपलब्ध होणारे बांधकाम साहित्याचा पूर्ण वापर करुन बचत साधावी.

८. कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत व नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावा.

९. सदरची कामे पूर्ण होईपर्यंत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा पूर्णत्व अहवाल शासनास त्वरीत सादर करावा.

१०. विषयांकित प्रमा अंदाजपत्रकातील तरतूदी, दर , वहनअंतर ,संकल्पन व इतर तांत्रिक निकष याबाबतची संपूर्ण जबाबदारी क्षेत्रिय मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांची राहील.

११. सदर प्र.मा. अंदाजपत्रकातील कामांसाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्तीय अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दत याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

प्रस्तावित कामासाठी होणाराखर्च ४७०२ लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (११) विदर्भ प्रदेश, (११) (०१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (४७०२ ७४९९))या लेखाशीर्षाखाली करावा व मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१६/२७/२०१६/लपा-०२, दि.२६/०५/२०१७ मध्ये विहित केल्यानुसार विशेष दुरुस्ती कामांच्या खर्चाबाबतीत रू. ५.०० कोटी पर्यंत प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार आं.वि.स व उ.स. यांच्या सहमतीने जलसंपदा विभागास प्रदान केले आहेत त्यानूसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

या कामास प्रदान करण्यात आलेली प्रशासकीय मान्यता सिं.व्य.(कामे) कार्यासनाच्या नोंदवही क्र. १७ सन २०१८-१९ मध्ये नोंदविण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३०७१९१४०८४३२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc36 4c6214f11ff7174bd5ef,
serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec6 51dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.03.07 19:16:44 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रत :-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे कार्यालय.
३. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
५. मा.विरोधीपक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
६. मा.विरोधीपक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई.
७. मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई.
१०. सचिव (जसंव्य व लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई.
११. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
१३. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.

१४. मुख्यअभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती,

१५. आंतर वित्त सल्लागार व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,

१६. अधीक्षकअभियंता, यवतमाळ सिंचन मंडळ, यवतमाळ,

१७. सिं.व्य. (कामे) कार्यासन संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक: प्रमाप्र-२०१८/ (प्र.क्र.४४४/२०१८)/ सिं.व्य.(कामे), दि. ०७/०३ /२०१९ चे सहपत्र

परिशिष्ट-अ

अ.क्र.	तपशिल	रक्कम रु. लक्ष
१	**धरण दुरस्ती**	१८,५७,८०१
२	**कालवा पुर्नस्थापना**	
अ	मातीकाम	१७,९३,७८६
ब	विमोचक दुरुस्ती. (Direct Outlet)	१४,२७,१५७
क	व्हि.आर.बी.दुरुस्ती	६,८४,००८
ड	कालव अस्तरीकरण	१९,५०,३७६
इ	ईतर बांधकाम दुरुस्ती	४,१०,३३७
	एकूण (१ व २)	**८१,२३,४६५**
	३% संकीर्ण व १ टक्का वर्कचार्ज एस्टॅब्लीशमेंट, स्वामीत्व शुल्क व G.S.T. व Royalty (२,४३,७०४+८१,२३४+९,७४,८१६+२०,९०,६३७)	३३,९०,३९१
	एकूण प्रस्तावाची किंमत	**१,१५,१३,८५६**

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.03.07 19:17:49 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव